


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३०७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.१८ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## उद्धव ठाकरेंना पक्षफुटीचा दुसरा मोठा धक्का !

### भास्कर जाधवांकडून मोलाचा सल्ला; नवसंजीवनीचा फॉर्म्युलाही सांगितला!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, रत्नागिरी :** उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे लोकसभेतील नऊपैकी सहा खासदार फुटणार, हे आता जवळपास स्पष्ट झालं आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आणि माजी मंत्री भास्कर जाधव यांनी 'डरो मत' म्हणत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना धीर देण्याचा प्रयत्न केला आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना मी एवढेच सांगेन की, डरो मत, बिलकुल डरो मत.. जो होनेवाला वो होनेही वाला है... चिंता मत करो, अशा स्वरूपाचा सल्ला उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते गुहागरचे आमदार भास्कर जाधव यांनी उद्धव ठाकरे यांना दिला आहे. यावेळी जाधव यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

हे दिवसही निघून जातील. ते घालवण्यासाठी आपल्याला आता काहीतरी कार्यक्रम राबवावा लागेल, काही निर्णय घ्यावे लागतील, काही




भूमिका आपल्याला ठरवाव्या लागतील, असं म्हणत भास्कर जाधव यांनी पक्षाला नवसंजीवनी देण्यासाठी संघटनेत काही बदल करण्याचे आवाहन उद्धव ठाकरेंना केलं आहे.

भास्कर जाधव म्हणाले की, गेली दीड-पावणे दोन वर्ष सातत्याने उद्धव ठाकरे यांचा पक्ष फुटणार, अशा वावड्या उठवल्या जात होत्या. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार वेगळा गट स्थापन करणार, ते अन्य कोणत्या पक्षात जाणार, अशा प्रकारची सातत्याने अफवांची राळ उठवण्याचे काम सुरू होते. आज केंद्रामध्ये व राज्यामध्ये भाजपची सत्ता आहे.

इतके तुम्ही सत्ताधीश असताना शेवटी समाजामध्ये काही विश्वासार्हता नावाची गोष्ट असते, ती तुमची कितपत शिल्लक राहते, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. आज हा पक्ष फोडणार, उद्या तो पक्ष फोडणार, शेवटी दुसऱ्या पक्षाकडून लोक घेऊन तुमच्या पक्षाची सूज जरी वाढत असली तरी समाजामध्ये तुमची असलेली प्रतिष्ठा, तुमचा असलेला आदर हा दिवसागणिक रसातळाला जात आहे. ही लोकशाही आहे, या लोकशाहीमध्ये कधी काय घडेल हे सांगता येणे कठीण आहे. त्यामुळे ज्या पक्षांबद्दल हे बोलले जाते त्यांनी थोडी जनाची नाही मनाची तरी बाळगावी, असा शब्दांत भास्कर जाधव यांनी भाजपवर आगपाखड केली आहे.

दरम्यान, या देशामध्ये ७० वर्ष काँग्रेसने काय केलं म्हणून प्रश्न विचारणारे लोक यांच्या पक्षाला काँग्रेसने असं तोडण्या-फोडण्याचं काम नाही केलं. काँग्रेसमध्ये पक्षांतर झाली नाही का? तर झाली पक्षांतरे. पण हे होत असताना छोटे-मोठे पक्ष संपवूनच टाकायचेत, आम्हाला आणि फक्त आम्हालाच या देशामध्ये राहायचंय, अशा एका दुष्ट हेतूने काँग्रेसने कुठलाही पक्ष संपवण्याचं काम केलं नाही, असंही भास्कर जाधव म्हणाले.

## मी जात नाहीए! 'त्या' खासदाराचा फोन आला; अंधारेंच्या दाव्यानं ट्विस्ट



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून ऑपरेशन टायगरची जोरदार चर्चा आहे. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे लोकसभेतील ९ पैकी ६ खासदार फुटल्याचे दावे केले जात आहेत. या सगळ्या घडामोडी सुरू असताना शिवसेना उबाठाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनी एका खासदाराशी संपर्क झाल्याचा दावा केला आहे.

ठाकरेंचे सहा खासदार खरंच शिंदेसेनेच्या वाटेवर आहेत का, त्यांनी खरंच त्यांचा वेगळा स्थापन केला आहे का, याबद्दल संदिग्धता कायम आहे. सहा खासदारांपैकी दोन खासदारांनी गट स्थापन करण्याच्या पत्रावर सहीच केली नसल्याचा विश्वास उद्धव ठाकरेंना आहे. पण सहाच्या सहा खासदार आपल्या सोबत आहेत, याबद्दल ठाकरेसेनेला खात्री नाही. त्यामुळे पेच कायम आहे.

दुसरीकडे फुटीर खासदारांनी त्यांच्या सह्यांचं पत्र लोकसभेच्या अध्यक्षांना दिलं की नाही, याबद्दलही साशंकता आहे. कारण लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेतल्याचा, त्यांना सह्यांचं पत्र दिल्याचा कोणताही फोटो समोर आलेला नाही. त्यामुळे या खासदारांनी ठाकरेंना रामराम केला असल्याच्या दाव्याला अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.

फुटीर खासदारांच्या यादीत असलेल्या संजय दिना पाटील यांच्याशी संपर्क झाल्याची माहिती ठाकरेसेनेच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनी दिली. 'खासदार संजय दिना पाटील यांनी खासदार अरविंद सावंत यांना संपर्क केला होता. मी कुठेही जात नाही असं त्यांनी सांगितलं. ते तिकडे जात नाहीत. मग कोण जातंय?' असा प्रश्न अंधारेंनी उपस्थित केला.

'संजय देशमुख, ओमराजे निंबाळकर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना फोन लागले नाहीत. पक्षानं लोकसभेच्या सगळ्या खासदारांसाठी व्हिप बजावलेला आहे. त्यांना उद्याच्या बैठकीला हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे उद्याचा दिवस महत्त्वाचा आहे. उद्या कोण कोण बैठकीला येतं ते पाहावं लागेल. उद्या सगळे खासदार आले. तर मी त्या सहा खासदारांची जाहीर माफी मागेन. त्यात मला जराही कमीपणा वाटणार नाही,' असं अंधारे म्हणाले.

लोकसभेत ठाकरेसेनेचे ९ खासदार आहेत. पक्षांतरबंदी कायद्याच्या अंतर्गत होणाऱ्या कारवाईला बगल द्यायची असल्यास दोन तृतीयांश खासदार पक्षातून बाहेर पडायला हवेत. म्हणजेच किमान ६ खासदारांनी ठाकरेंची साथ सोडायला हवी. ६ खासदार फुटल्याचे दावे सकाळपासून करण्यात आले. त्यांची नावंदेखील समोर आली. पण यातील २ खासदारांनी गट स्थापनेच्या पत्रावर स्वाक्षरीच केली नसल्याचा विश्वास ठाकरेंना आहे. अशा परिस्थितीत ऑपरेशन टायगर अयशस्वी होऊ शकतं.

## अल्पवयीन मुलीला पळविणाऱ्यांवर पॉक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करा

### तेरामैल येथे मरिआईवाले समाजाचा रास्ता रोको

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, सोलापूर :** मंद्रूप येथील एका अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याप्रकरणी संबंधित संशयितांवर तात्काळ पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी मरिआईवाले समाजातील महिला, पुरुष व लहान मुलांनी मंगळवारी सायंकाळी साडेचारच्या सुमारास सोलापूर-विजयपूर राष्ट्रीय महामार्गावरील तेरामैल येथे रास्ता रोको आंदोलन केले. प्रहार संघटनेचे जमीर शेख व अजित कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक तब्बल अर्धा तास ठप्प झाली होती. आंदोलकांनी आरोपींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी करत जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे महामार्गाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. परिस्थिती चिघळू नये म्हणून मंद्रूप पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला होता. यावेळी मंद्रूप पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक शंकर पटवारी यांनी आंदोलकांशी चर्चा केली. संबंधित प्रकरणात चार दिवसांत गुन्हा दाखल करून आवश्यक कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. प्रहार संघटनेचे कार्याध्यक्ष तायाप्पा कोळी यांनी याप्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदन सादर केले आहे. त्यात नमूद करण्यात आले आहे की, मंद्रूप परिसरातील एका अल्पवयीन मुलीला सुमारे दोन महिन्यांपूर्वी अज्ञात व्यक्तींनी फूस लावून पळवून नेल्याची नोंद मंद्रूप पोलिस ठाण्यात करण्यात आली होती. पुढील तपासात सदर मुलगी माळशिरस तालुक्यातील काही व्यक्तींकडे असल्याचे



समोर आले. निवेदनानुसार, रंजीत गोरख चव्हाण, गोरख आण्णा चव्हाण, सोनाबाई गोरख चव्हाण, रोहित गोरख चव्हाण, राहलु गोरख चव्हाण आणि सारांगे गोरख चव्हाण या सहा जणांनी संगनमत करून अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. गेल्या दोन महिन्यांपासून मुलीला बेकायदेशीररीत्या डांबून ठेवल्याचाही आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सोमवारी मुलीचा शोध घेऊन तिला मंद्रूप पोलिसांच्या स्वाधीन केले. मात्र, मुलीला तिच्या पालकांच्या ताब्यात न देता बाल सुधारगृहात पाठविण्यात आल्याने समाजात तीव्र संतापाची भावना व्यक्त होत आहे. संबंधित आरोपींवर पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करावी तसेच मुलीला तिच्या आई-वडिलांच्या ताब्यात देण्यात यावे, अशी मागणी आंदोलकांनी केली.

## मुल शहरात बनावट तंबाखूचा कारखाना उघड !

### पोलिसांचा छापा- ९.८५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, मुल (चंद्रपूर) :** मुल शहरात घराच्या आडोशाला सुरू असलेल्या बनावट आणि प्रतिबंधित सुगंधित तंबाखू निर्मितीच्या अवैध उद्योगाचा स्थानिक गुन्हे शाखा व मुल पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या धडक कारवाईत तब्बल ९ लाख ८५ हजार ४४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एक आरोपी अटकेत आहे.




विश्वसनीय गुप्त माहितीनुसार, मुल येथील तोहिद शेख हा युवक महाराष्ट्रात बंदी असलेला सुगंधित तंबाखू व पानमसाला साठवून ठेवून त्याची विक्री करत होता. याशिवाय तो स्वतःच्या घरातच बनावट तंबाखू तयार करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

या माहितीच्या आधारे, स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर आणि मुल पोलीस स्टेशनच्या पथकाने संयुक्त कारवाई करत आरोपी मोहम्मद तोहिद मोहम्मद आरिफ (वय २७, रा. ताडाळा रोड, मुल) याच्या घरावर छापा टाकला. छाप्यात तंबाखू तयार करण्यासाठी लागणारे साहित्य, मशीन, मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित तंबाखू व पानमसाला साठा तसेच वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी एमएच-२७ बीव्ही-२९०७ क्रमांकाची कार जप्त करण्यात आली.

कारवाईनंतर आरोपी व मुद्देमाल अन्न व औषध प्रशासन, चंद्रपूर यांच्या ताब्यात देण्यात आला. त्यांच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता व अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास मुल पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे व उपविभागीय पोलीस अधिकारी सत्यजित आमले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कारवाईत खालील अधिकारी व कर्मचारी सहभागी होते. पोलीस निरीक्षक अमोल काचोरे (स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर), पोलीस निरीक्षक विजय राठोड (मुल), पोउपनि संतोष निंभोरकर, पोउपनि विनोद भुरले, पोउपनि रूपेश कुंभरे, पोलीस अंमलदार धनराज करकाडे, जंयत चुनारकर, चेतन गज्जलवार, सुरेंद्र महतो, सुमित बरडे, प्रफुल्ल गारघाटे, किशोर वाकाटे, दिपीका सोडणार तसेच सायबर पोलीस स्टेशन चंद्रपूरचे कर्मचारी यांनी पार पाडली.

## चंद्रपूर मनपात काँग्रेसचा नवा गटनेता

### वडेट्टीवार गटाला धक्का; सुरेंद्र अडबाले नवे गटनेते

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.१७, चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिकेत प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसचा नवा गटनेता अखेर ठरला आहे. खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या गटाचे सुरेंद्र अडबाले यांची चंद्रपूर मनपाच्या काँग्रेस गटनेतेपदी निवड करण्यात आली आहे. नागपूर विभागीय आयुक्तांनी आज अधिकृतपणे यासंदर्भातील आदेश जारी केले आहेत.

या निवडीमुळे चंद्रपूर काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजी आणि संघर्ष आता अधिक तीव्र आणि उघड झाला आहे. चंद्रपूर मनपा निवडणुकीत मतदारांनी काँग्रेसला सर्वात मोठा पक्ष म्हणून कौल दिला होता, पक्षाचे तब्बल २७ नगरसेवक निवडून आले होते. मात्र, नेत्यांमधील अंतर्गत हेवेदाव्यांमुळे आणि गटबाजीमुळे काँग्रेसच्या हातात आलेली सत्ता गेली होती.

यानंतर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यातील राजकीय संघर्ष टोकाला पोहोचला होता. यापूर्वी हे गटनेतेपद विजय वडेट्टीवार यांच्या गटाकडे होते. मात्र, आता खासदार प्रतिभा धानोरकर यांनी जोरदार राजकीय खेळी करत हे पद आपल्या गटाकडे खेचून आणले आहे आणि वडेट्टीवार गटाला मोठा धक्का दिला आहे.

## अप्पर तहसील कार्यालयासाठी लढा कायम;

### बाजारपेठ बंद मागे, मात्र उपोषण सुरूच

**अक्षराज : जाफर शेख**

**दि.१७, बोरी (परभणी) :** बोरी येथे मंजूर झालेले अप्पर तहसील कार्यालय चारठाणा येथे स्थलांतरित करण्याच्या निर्णयाविरोधात सुरू असलेल्या आंदोलनाबाबत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. तहसीलदार मॅडम यांनी शासनाच्या वतीने सकारात्मक प्रतिसाद देत प्रशासनाशी संवाद सुरू असल्याचे सांगितल्यानंतर यापूर्वी जाहीर करण्यात आलेला बेमुदत बाजारपेठ बंद मागे घेण्यात आला आहे.




मात्र, अप्पर तहसील कार्यालय बोरी येथेच सुरू करण्याची मागणी कायम ठेवण्यात आली असून आंदोलन सुरूच राहणार असल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले आहे. मागणी मान्य होईपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करत मंगळवार पासून उपोषण सुरू करण्यात आले आहे .

आंदोलनाला बोरी व परिसरातील नागरिक, व्यापारी, शेतकरी, विविध सामाजिक संघटना, महिला व युवकांचा पाठिंबा मिळत असून प्रशासनाने लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.




## फ्लाईंग शीख !

भारतातीलच नव्हे तर जगातील महान धावपटूत ज्यांची गणना होते असे भारताचे महान धावपटू फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांचा आज स्मृतिदिन. १८ जून २०२१ रोजी मिल्खा सिंग यांचे निधन झाले होते. फ्लाईंग शीख अशी उपाधी मिळालेल्या मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी पंजाबातील गोविंदपुरा या गावी एका गरीब शीख कुटुंबात झाला. मिल्खा सिंग यांना लहानपणापासून धावण्याची खूप आवड होती. राष्ट्रीय पातळीवरील धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी यश मिळवले मात्र मिल्खा सिंग प्रकाशझोतात आले ते १९५८ साली.

यावर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी ४०० मीटरच्या शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. मिल्खा सिंग हे राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते. त्यानंतर १९५८ च्या टोकियो येथे झालेल्या आशिआई स्पर्धेत मिल्खा सिंग यांनी २०० आणि ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. एकाच आतंरराष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदक मिळवणारे ते भारताचे पहिले खेळाडू आहेत. १९६२ च्या जकार्ता आशिआई स्पर्धेतही त्यांनी ४०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. १९६० च्या रोम ऑलम्पिक स्पर्धेत मिल्खा सिंग यांचे पदक अतिशय सूक्ष्म फरकाने हुकले. या ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांनी ४०० मीटर शर्यत ४५. ७३ सेकंदामध्ये पूर्ण केली. जर्मनीचा धावपटू कार्ल कुफमॅनपेक्षा ते सेकंदाच्या १०० व्या भाग एव्हढ्या कमी फरकाने मागे राहिले. अतिशय सूक्ष्म फरकाने ऑलिम्पिक पदक हुकल्याने जगभरातील क्रीडाप्रेमींनी हळहळ व्यक्त केली. त्यांचे ऑलिम्पिक पदक हुकले तरी त्यांनी शर्यत पूर्ण केलेली ही वेळ राष्ट्रीय विक्रम ठरली विशेष म्हणजे त्यांचा हा राष्ट्रीय विक्रम ४० वर्ष अबाधित होता. याच स्पर्धेदरम्यान त्यांची भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार निर्मल कौर यांच्याशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला.

२०२१ सालीच त्यांच्या पत्नीचे कोरोनाने निधन झाले. त्यांचे पुत्र जीव मिल्खा सिंग हे प्रसिद्ध गोल्फपटु आहेत. मिल्खा सिंग यांना फ्लाईंग शीख ही उपाधी पाकिस्तानचे माजी राष्ट्राध्यक्ष जनरल आयुब खान यांनी दिली. १९६० साली पाकिस्तानचा पाकिस्तानचा जगप्रसिद्ध धावपटू अब्दुल खालीक याने आव्हान दिले. मिल्खा सिंग यांनी त्याला पाकिस्तानमध्ये जाऊन हरवले. ते या स्पर्धेत ज्या प्रकारे धावले ते पाहून पाकिस्तानमध्येही ते खूप लोकप्रिय झाले. ही स्पर्धा पाहण्यासाठी जनरल आयुब खान स्वतः हजर होते. या स्पर्धेनंतरच जनरल आयुब खान यांनी त्यांना फ्लाईंग शीख ही उपाधी दिली. भारत सरकाररनेही त्यांना अर्जुन व पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा योग्य गौरव केला. त्यांच्या जीवनावर आधारित भाग मिल्खा भाग हा चित्रपट येऊन गेला. या चित्रपटात फरहान अख्तर यांनी मिल्खा सिंग यांची भूमिका केली होती.

मिल्खा सिंग हे भारतातीलच नाही तर जगभरातील धावपटूंचा आदर्श होते. निवृत्तीनंतर त्यांनी तरुण धावपटूंना मार्गदर्शनही केले. मिल्खा सिंग यांचे पाच वर्षापूर्वी १८ जून २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली. फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**

# झाशीची राणी लक्ष्मीबाई; तळपत्या सुर्याचा तेजोमय प्रकाश

आज इतिहासातच नाही तर जगात झाशीची राणी लक्ष्मीबाईचे नाव मोठ्या स्वाभिमानाने घेतल्या जाते. कारण कमी वयात देशासाठी लढा उभारून इंग्रजांशी दोन-दोन हात करून संघर्ष केला यात लक्ष्मीबाईची महानता अजरामर आहे. झाशीची राणी लक्ष्मीबाईचा जन्म मोरोपंत तांबे आणि भागीरथीबाई यांच्या पोटी उत्तर प्रदेशातील काशी (वाराणसी) येथे १९ नोव्हेंबर १८२८ ला झाला.

लक्ष्मीबाईचे मुळ नाव मणिकर्णिका होते. लक्ष्मीबाईचे वडील मोरोपंत तांबे हे पुण्याच्या पेशव्यांच्या आश्रयाला होते. मुळचे रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील गुढे गावचे होते.नंतर काशी येथे स्थायी झाले व तिथे लक्ष्मीबाईंचा जन्म झाला. उत्तर भारतातील झाशी राज्यातील महाराज गंगाधरराव नेवलेकर यांच्याशी १९ में १८४२ ला विवाह झाला आणि लक्ष्मीबाई झाशीची राणी बनली.परंतु २१ नोव्हेंबर १८५३ रोजी महाराज गंगाधरराव नेवलेकर यांचे निधन झाले तेव्हा राणी अवघ्या १८ वर्षांच्या होत्या.

तथापि राणीने आपला संयम आणि धैर्य राखले आणि बाळ दामोदरच्या लहान वयामुळे राणी लक्ष्मीबाईने राज्याचा ताबा घेतला. लक्ष्मीबाई एकोणिसाव्या शतकातील झाशी राज्याच्या महाराणी होत्या. १८५७ च्या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी विरूध्द झालेल्या स्वातंत्र्य उठावातील एक अग्रगण्य तेजस्वी, महाप्रतापी आणि कमी वयातील बहादुर सेनानी होत्या.७ मार्च १८५४ रोजी ब्रिटिश सरकारने झाशीला ब्रिटिश साम्राज्यात सामील होण्याचे आदेश देणारे अधिकृत राजपत्र जारी केले.ब्रिटीश अधिकारी ॲलिसचा हा आदेश राणी लक्ष्मीबाईने ऐकल्यावर तळ पायाची आग मस्तकात गेली व आदेश पाळण्यास नकार दिला आणि मी झाशी देणार नाही असे जाहीर केले व झाशी हे बंडाचे केंद्र बनले.सर ह्यु रोज यांनी २२ मे १८५८ रोजी काल्पीवर हल्ला केला. परंतु राणी लक्ष्मीबाईने आपल्या पराक्रमाने ब्रिटिशांना पराभूत केले.

यामुळे ब्रिटिश तिलमीला झाले व पुन्हा काल्पीवर हल्ला केला आणि राणीचा पराभव झाला.या पराभवानंतर रावसाहेब पेशवे, बांद्याचे नवाब, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई आणि इतर महत्वाचे सैनिक गोपाळपूरला जमले. यावेळी राणीने ग्वाल्हेर ताब्यात घेण्याचा सल्ला दिला. लक्ष्मीबाई आणि तात्या टोपे यांनी बंडखोर सैन्यासह ग्वाल्हेरवर कूच केले व ग्वाल्हेरचा किल्ला काबीज केला आणि ग्वाल्हेरचे राज्य पेशव्यांच्या ताब्यात दिले.१८५७ चा उठाव हा संपूर्ण हिंदुस्थानात झाला. त्याचप्रमाणे ५ जून १८५७ ला झाशीतही शिपायांचा उद्रेक झाला व केवळ ३५ शिपायांनी इंग्रजांना पळवून सोडले.२२ में १८५८च्या कल्पीच्या लढाईनंतर राणी ३०-३१ मे १८५८ रोजी ग्वाल्हेरला आल्या. तेथे स्वस्त न बसता लक्ष्मीबाईंनी आपल्या सैन्याची कवायत नियमित सुरू ठेवली. इंग्रजांना रोखण्यासाठी कशा प्रकारे मोर्चे बांधणी करावी या विषयी त्यांनी चर्चा केली. अचानक याचवेळी १७ जून १८५८ रोजी ब्रिटिश अधिकारी स्मिथ सैन्यासह ग्वाल्हेरच्या अगदी जवळ कोटा की सराय येथे



येऊन पोहोचला व त्यांने त्वरित हल्ला चढवला. अशा परिस्थितीत लक्ष्मीबाईने रणांगणात धाव घेतली आणि लक्ष्मीबाईने ब्रिटिश शिपायांना तलवारीने सपासप कापत सामोरं जात होत्या. विजेसारख्या तळपणाऱ्या राणीकडे पाहून त्यांच्या सैनिकांमध्ये आणखी जोश आला व ब्रिटिश सैन्याला छाटुन काढले.


अशा परिस्थितीत इंग्रज अधिकारी स्मिथचे सैन्य मागे हटणार होते.परंतु घात झाला आणि नव्या दमाची एक फौज बाजूच्या टेकडीवरून चालून आली. अशा परिस्थितीत आपला टिकाव लागणार नाही हे पाहुन स्वारांनिशी बाहेर पडल्या. थोडे पुढे जाताच एका ओढ्यापाशी त्यांचा राजरत्न नावाचा (हा नवीन घोडा होता) घोडा अडला. नेहमीचा सारंगी नावाचा घोडा शेवटच्या लढाईत त्यांच्याबरोबर नव्हता. अशा परिस्थितीत काही केल्या घोडा ओढा ओलांडत नव्हता. इंग्रजांशी लढत असतांना राणी लक्ष्मीबाई रक्तबंबाळ होऊन घोड्यावरून खाली कोसळल्या. परंतु पुरूषी वेशात असलेल्या राणी लक्ष्मीबाई यांना इंग्रज ओळखू शकले नाहीत व इंग्रज पुढे निघून गेले. घायाळ झालेल्या राणी लक्ष्मीबाई यांना सेवक रामचंद्र देशमुखांनी फुलबाग येथील बाबा गंगादास यांच्या मठात आणले. आपला देह इंग्रजांच्या हाती लागू नये अशी त्यांची इच्छा होती. फुलबाग येथे बाबा गंगादास यांच्या मठात तात्या टोपे, रामचंद्रराव देशमुख, काशीबाई कुनविन, गुलमोहम्मद, बांदा नवाब बहादुर अली आणि दामोदर राव यांनी मुखाग्नी दिली.अशा प्रकारे महान योध्द्या राणी लक्ष्मीबाई यांनी वीरमरण पत्करून वयाच्या तेविसाव्या वर्षी प्राणज्योत मालवली.राणी लक्ष्मीबाईचा स्वर्गवास १७ जून १८५८ ला झाला. परंतु इंग्रज सरकारने राणी लक्ष्मीबाईना १८ जूनला मृत घोषित केले. त्यामुळे दरवर्षी १८ जूनला पुण्यतिथी साजरी करण्यात येते. जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश -पाताळ आहे तोपर्यंत झाशीची राणी लक्ष्मीबाई याचे नाव अमर राहील. देशात झाशीची राणी लक्ष्मीबाई याची प्रेरणा निरंतर आपल्या हृदयात रहावी यासाठी त्यांच्या पुण्यतिथी निमित्त देशात वृक्ष लागवड व्हायला हवी. कारण असे जर झाले तर आपल्याला प्रत्येक झाडाच्या पानांत, फुलात, फळात झाशीची राणी लक्ष्मीबाई याचे दर्शन अवश्य होईल. राणी लक्ष्मीबाईना माझा कोटी कोटी प्रणाम. जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर**

# आंबा, कोय आणि जीवनसूत्र

उन्हाळा हा तापदायक ऋतू आहे. दिवसभर काबाडकष्ट करणाऱ्यांना तर उन्हाळा फारच जाचक वाटतो. उष्माघातामुळे दरवर्षी अनेकांचे मृत्यूही होतात. मात्र याच उन्हाळ्यात निसर्गाच्या चमत्कारातून माणसाला आनंद आणि सुख मिळते. गुलमोहर बहरतो, जांभळाच्या झाडाखाली जांभळ्यांचा सडा पडतो आणि आंब्याची झाडे फळांनी लगडून जातात.

आंब्याच्या झाडाला मोहर लागण्यापासून ते कैऱ्या तयार होईपर्यंत होणारे बदल एखाद्या गर्भवती स्त्रीच्या मातृत्वप्रवासाप्रमाणे नजरेत साठवण्यासारखे असतात. कैऱ्यांना पाड लागला की त्या अर्धकच्च्या आंब्यांच्या रूपात दिसू लागतात. हे आंबे झाडावरून उतरवून घरी आणले जातात आणि गवताच्या चघळात त्यांची आडी लावली जाते. काही दिवसांत ते पिकतात आणि बाजारपेठेत विक्रीसाठी जातात.



**- किशोर जाधव, सोलापूर**
**मो. नं. ९९२२८८२५४१**

जुन्या वळणाचे काही लोक आपल्या पूर्वजांना आंबा किंवा आंब्याचा रस नैवेद्य म्हणून अक्षय तृतीयेला अर्पण केल्याशिवाय आंबे खात नाहीत. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनाच आवडणारा आंबा उन्हाळ्याचा त्रास गोड करतो. मुले चोखून आंबे खातात, तर मोठी माणसे कापून खातात. एखाद्या प्रौढ व्यक्तीतील बालमन अजूनही जिवंत असेल, तर तोही लहान मुलांप्रमाणे चोखून आंबा खाण्याचा आनंद घेतो. आंब्याचा रस हा घराघरांतील उन्हाळी आहारातील आनंद द्विगुणित करणारा पदार्थ बनतो. मधुमेह असणाऱ्यांना आंबे खाण्यात संयम बाळगण्याचा सल्ला दिला जातो; परंतु मनावर नियंत्रण मिळवणे सर्वांनाच जमत नाही. आंब्याच्या काही जाती विशेष लोकप्रिय आहेत. हापूस आंब्याला सर्वाधिक मागणी असली तरी केशर, पायरी, तोतापुरी यांसारखे आंबेही त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण चवीमुळे लोकांच्या पसंतीस उतरतात.आंब्याचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे एका आंब्याच्या कोयीपासून पुन्हा नवीन झाड जन्माला येते. त्या झाडाला सात-आठ वर्षांनी आंबे लागतात आणि त्या आंब्यांच्या कोयी पुन्हा नव्या झाडांना जन्म देतात. निसर्गाचे हे अद्भुत चक्र वर्षानुवर्षे अखंड सुरू आहे. एका झाडापासून हजारो-लाखो झाडे निर्माण होण्याची ही प्रक्रिया समजून घेताना त्यातून जीवनाचेही एक महत्त्वाचे सूत्र शिकण्यासारखे आहे.

पैसा, मूल्ये आणि जिव्हाळा यांची पेरणी आंब्याच्या कोयीप्रमाणे केली पाहिजे. पैसा हा खरोखरच आंब्यासारखा आहे. कोय म्हणजेच बचत करायची रक्कम तर वरील गर म्हणजेच तत्काळ खर्च करायची रक्कम. ज्या रकमेतून आपला घर खर्च, चैन विलास आणि मौज मजा करता येते. पैसा बचत करून योग्य ठिकाणी गुंतवणे म्हणजे आंबा खाऊन त्याची कोय जमिनीत पेरण्यासारखे आहे. काही वर्षांनी त्या पैशाला पैशांची फळे लागलेली दिसतात. आज मिळणारे उत्पन्न केवळ खर्च करत राहणे म्हणजे आंबा खाऊन त्याची कोय कुठेही फेकून देण्यासारखे आहे. परंतु बचत करून ते पैसे पीएफ, एसआयपी किंवा इतर गुंतवणूक योजनांमध्ये टाकणे म्हणजे कोय पेरून तिची निगा राखण्यासारखे आहे.

मूल्यांचेही तसेच असते. आपल्या व्यक्तिमत्त्वातील सद्गुणांची पेरणी पुढच्या पिढीत केली पाहिजे. दुर्गुण आणि वाईट कृत्ये आंब्याच्या गोड गराप्रमाणे आकर्षक वाटू शकतात; परंतु त्यातील सुसंस्कार, संयम आणि सद्वर्तनाचा गाभा शोधून तो जपला पाहिजे. तो स्वतःमध्ये रुजवला आणि वाढवला पाहिजे. आणि पुढच्या पिढीला देखील वारसा रूपाने दिला पाहिजे.

ज्याप्रमाणे आर्थिक क्षेत्रात 'कंपाऊंडिंग'चा नियम काम करतो, त्याचप्रमाणे सद्गुण, संस्कार आणि चांगली कृत्येही समाजजीवनात कार्यरत असतात. एका चांगल्या विचारापासून अनेक चांगले विचार जन्म घेतात, एका सुसंस्कारित व्यक्तीकडून अनेक सुसंस्कारित व्यक्ती घडतात आणि एका चांगल्या कृतीतून समाजपरिवर्तनाची बीजे रुजतात.

म्हणूनच आंबा खाताना त्याची कोय फेकून देऊ नका; तिच्यामध्ये दडलेले जीवनसूत्र ओळखा. पैसा, मूल्ये आणि माणुसकी यांची बीजे पेरा. कारण आज पेरलेली प्रत्येक चांगली कोय उद्याच्या समृद्ध, सुसंस्कृत आणि सुंदर समाजाचे विशाल वृक्ष बनू शकते.

# लांबलेला 'पाऊस'

साधारणपणे सहा जुन च्या आसपास पावसाचे आगमन होते मात्र गेल्या काही वर्षांपासून निसर्ग चक्रच बदलुन गेले आहे आणि पावसाचे वेळापत्रक देखील विस्कळीत झाले आहे.अर्धा जून महिना संपत आला आहे मात्र अजुनही वरूण राजाच्या आगमनाची चाहूल लागली नाही. तिकडे केरळ, तामिळनाडू मधे पाऊस पडत आहे मात्र महाराष्ट्र प्रतिक्षेतच आहे. अगोदरच ईराण ईस्त्रायल युद्धाने महागाई, बेरोजगारी, अन्न धान्य, इंधन टंचाईच्या झळा बसत आहेत,अजुनही तापमानवाढीचे चटके बसतच आहेत. जगाचा पोशिंदा बळीराजा पेरणी आवणी, लावणी साठी पावसाची चातकासारखी वाट पहात आहे. राज्यात सर्वत्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे, अनेक ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे. पण आतातर अनेक धरणांनी तळ गाठला आहे, धरणांमधेच पाणी नाही तर पुरवठा होणार कुठुन. जलसाठे कोरडेठाक पडले आहेत, बोरिंग बंद पडल्या आहेत. नाशिक जिल्ह्यातील जलसाठा केवळ काही दिवस पुरेल इतकाच शिल्लक राहिला आहे राज्यभर हीच परिस्थिती आहे. अनेक शहरांमध्ये पाणीबाणी सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे, अनेक ठिकाणी कमी प्रमाणात पाणीपुरवठा केला जात आहे. ऐकूणच जलसंकट दिवसेंदिवस गंभीर बनत चालले आहे आणि आपण सगळे वरुणराजाच्या आगमनाची चातकासारखी वाट पहात आहोत. मात्र अजुनही काही दिवस वाट पहावी लागणार आहे, साधारणपणे येत्या चार पाच दिवसात वरूणराजाचे आगमन होण्याची सुचिन्हे दिसु लागली आहेत हे चांगले संकेत आहेत. मात्र या वर्षी एल निनो चा प्रभाव जाणवणार असुन कमी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे ही चिंतेची बाब आहे. ऊशिराने पाऊस सुरू झाला तर त्याचा विपरीत परिणाम शेती ऊत्पादनावर होणार. भरीस भर म्हणून गेल्या काही वर्षांपासून अवकाळी पाऊस, वादळे, नैसर्गिक आपत्ती सातत्याने येत आहे आणि हातातोंडाशी आलेली पिके नष्ट करून होऊन केवळ आणि केवळ नुकसानच होत आहे. ऐन वेळी शेतीसाठी लागणारा पाणी पुरवठा बंद केला आहे केवळ पिण्यासाठी पाणी राखीव केले गेले आहे. सरकारने आता याबाबत गांभीर्याने विचार सुरू केला आहे, कमी पावसामुळे पुढील वर्षीच्या पाण्याचे नियोजन आतापासूनच करायला हवे आणि तशी ऊपाययोजना होणे गरजेचे आहे.राज्यात देखील गेल्या साठ सत्तर वर्षांपासून पाणी योजना आखल्या जात आहे, कोल्हापूर टाईप बंधारे छोटी छोटी धरणे बांधली जात आहेत, राज्यात स्वतंत्र जलसंपदा खाते आहे, जलसंधारणावर कोट्यावधी रुपये खर्च केले जात आहेत, मागेल त्याला शेततळे, जलयुक्त शिवार यांचा मोठा गाजावाजा केला जात आहे,पश्चिम घाट माथ्यावरील समुद्रात वाहून जाणारे पाणी अडवून कोकणात आणण्यासाठी अनेक वर्षांपासून नियोजन होत आहे.आता तर शहरीभागात गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये वॉटर हार्वेस्टिंग सिस्टम बंधनकारक करण्यात आली आहे. धरणे बांधण्यासाठी करोडो रुपयांचे नियोजन केले जाते मात्र ते प्रकल्प वर्षांनुवर्षे रखडतात त्यामुळे किंमत वाढते आणि एवढे करूनही जल सिंचन तर होत नाही मात्र भ्रष्टाचाराच्या गटारगंगेत करोडो रुपये झिरपतात. पाण्याचे नियोजन व्हावे यासाठी कृष्णा खोरे विकास महामंडळ देखील स्थापन करण्यात आले होते आणि रोख्यांच्या माध्यमातून निधी ऊभारण्यात आला होता. एवढं सगळं करूनही पाणी टंचाई कमी होण्याऐवजी राज्यभर पाणी टंचाई दिवसेंदिवस वाढतच चालली आहे मात्र पाऊस लांबणीवर पडला कि आपले नियोजन किती फोल ठरते हे या निमित्ताने अधोरेखित झाले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून सत्तर पंचाहत्तर वर्षे होऊन गेली तरी पाण्याचे नियोजन होऊ शकले नाही याची जबाबदारी कोणाची? दैवाच्या, पावसाच्या भरवशावर किती काळ जगायचे, आज पाण्यासाठी अनेक ठिकाणी वादविवाद होत आहे, हे चित्र बदलणार का?

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे.**
**९१५८४९५०३७**

## रिचेबल

नाराज बडे पुढारी
मधेचं नॉट रिचेबल
संपर्कक्षेत्राचे बाहेर
कापून टाके केबल

प्रेशर टॅक्टीज मस्त
मिळेभली अटकळ
बाहेर पाडायं उद्रेक
मनातली खळखळ

पुरवले नाहीत हट्टा
असह्य हो जळजळ
अज्ञातवासातजाता
चेहरा सतेज उजळ

बोलून घाण करूने
शांतता भली अंमळ
जठराग्नी शांतवाया
उलटी वाटे मळमळ

विरोधात उभी राहते
संपुष्टात येईचळवळ
आपसूक चुप्प होती
किटाणूंची वळ वळ

चार भिंतीत कोडावे
आसवेढाळू घळघळ
दार उघडू आल्यावर
खोटे हसा खळखळ

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## ठाण्यात आज पुन्हा २४ तास पाणीबाणी



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१७, कळवा (ठाणे) :** या वर्षी पावसाचे आगमन लांबल्याने राज्यावर पाणी टंचाईचे आसमानी संकट ओढवले आहे. अल निनोसारख्या महाभयंकर वादळामुळे पाऊस अद्यापही राज्यभर व्यापलेला दिसत नाही. त्यामुळे नागरिक हवालदिल झाले आहेत. शेतकरी राजा देखील आकाशाकडे डोळे लाऊन चातकासारखी पावसाची वाट पहात आहे. पाऊस नसल्याने आणि वाढत्या तापमानामुळे पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांनी पाण्याचा तळ गाठला आहे. यामुळे ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अनेक भागांमध्ये पाणी पुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने भविष्याचा विचार करून अत्यंत महत्वाचा निर्णय घेतला आहे. गुरुवार, दिनांक १८ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजल्यापासून ते शुक्रवार, दिनांक १९ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत तब्बल २४ तास काही भागातील पाणी पुरवठा बंद राहणार आहे. त्यामुळे कळवा, मुंब्रा, दिवा आणि तसेच ठाणे शहरातील माजिवडा, मानपाडा आणि वागळे इस्टेट मधील काही भागातील नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागणार आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत करण्यात येणाऱ्या २० टक्के पाणी कपातीच्या निर्णयामुळे हा बदल करण्यात आला आहे. दरम्यान या कालावधीत पाणीपुरवठा पूर्ण बंद राहिल्यानंतर तो पुन्हा सुरू झाल्यावर पुढील १ ते २ दिवस नागरिकांना कमी दाबाने पाणी मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पाण्याचा काटकसरीने वापर करावा असे आवाहन पालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# टंचाईमुळे अहिल्यानगर जिल्ह्यात पाणीकपात लागू होणार

## जिल्हाधिकारी डॉ.आशिया यांचा आदेश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, अहिल्यानगर :** धरण व कालव्यांच्या क्षेत्रातील अनधिकृत पाणीउपसा थांबवण्यासाठी वीजपुरवठा खंडित करावा असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले आहेत. महापालिका, नगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिवसाआड पाणीपुरवठ्याचा निर्णय घ्यावा, असेही आदेश त्यांनी दिले.



एल निनोचा संभाव्य प्रभाव, पाणीसाठा आरक्षण व कृषी विभागाच्या उपाययोजनांच्या तातडीच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी विविध निर्देश दिले. निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते, जलसंपदा विभागाचे अध्यक्ष अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता सायली पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे, नगरपालिका प्रशासनाधिकारी डॉ.प्रदीप पठारे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ.वीरेंद्र बढदे, नायब तहसीलदार भारती घोरपडे तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पिण्याच्या पाण्याची संभाव्य टंचाई लक्षात घेऊन शेतीसाठीचे पाणी आवर्तन तात्काळ बंद करावे, जलसंपदा विभागाने पाणीचोरी रोखण्यासाठी भरारी पथके नियुक्त करावीत, कालवे व बॅकवॉटर क्षेत्रातील अनधिकृत उपसा त्वरित बंद करावा, त्यासाठी विद्युत वितरण केंद्रे बंद करून वीज पुरवठा खंडित करावा, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. महापालिका, नगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांनी उपलब्ध पाणी साठ्यानुसार पाणी पुरवठ्याची नियोजन करावे, स्थानिक परिस्थितीनुसार नागरिकांना दैनंदिन किंवा दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घ्यावा, जलसंपदा विभागाने पाणीसाठ्याची स्थिती तपासून पाहण्याचा योग वापरासाठी सविस्तर नियोजन आराखडा तातडीने सादर करावा, असेही त्यांनी सांगितले.

कृषी विभागाने शेतकऱ्यांना पेरणीबाबत योग्य मार्गदर्शन करावे,जमिनीत पुरेशी ओल व समाधानकारक पाऊस पडल्याशिवाय पेरणीची घाई करू नये. याची जनजागृती करावी, उतारावर आडवी पेरणी करण्याची जनजागृती करावी, खतांचा काळाबाजार, लिंकग होणार नाही, यासाठी तपासणी करावी, डिजिटल पीक पहाणी मोहीम तातडीने पूर्ण करावी, अशीही सूचना देण्यात आल्या.

---

**कालव्याच्या पाणीऐवजी टँकरद्वारे पाणी**

कालव्यांद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करताना मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्यास अशा ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे अधिक फायदेशीर की पाणी बचतीचे ठरत असेल तर त्याची पर्यायी तांत्रिक व प्रशासकीय पातळीवर तपासणी करण्याचे निर्देश ही जिल्हाधिकारी आशिया यांनी बैठकीत दिले.

## लखनौ (उत्तर प्रदेश) येथे महाराष्ट्राचे सुभाष पाटील यांना अयोध्येच्या रामलल्लाच्या मूर्तीने सन्मानित



**अक्षराज : संदिप येवले**

**दि.१७, मुंबई :** तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडिया व उत्तर प्रदेश तायक्कांदो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न श्री.अटल बिहारी वाजपेयी क्रीडा संकुल, के.डी.सिंह बाबू स्टेडियम, लखनौ (उत्तर प्रदेश) येथे दि.१२ ते १४ जून २०२६ दरम्यान राष्ट्रीय पंच सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. या सेमिनारसाठी आंतरराष्ट्रीय प्रथम श्रेणीचे रेफरी व ७ वी डिग्री ब्लॅक बेल्ट सुभाष पाटील हे प्रमुख प्रशिक्षक म्हणून उपस्थित होते.या सेमिनारसाठी देशभरातील २०० हून अधिक तायक्कांदो खेळाडू व पंचांनी सहभाग नोंदविला.

२०२६ पासून वर्ल्ड तायक्कांदोने लागू केलेल्या नवीन नियमांचा अभ्यास सुभाष पाटील यांनी इस्वातिनी (दक्षिण आफ्रिका) येथे जाऊन प्रत्यक्ष प्रशिक्षणाद्वारे केला असून,भारतात त्या नियमांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी ते सातत्याने कार्यरत आहेत.या नव्या नियमांवरील हे त्यांचे पाचवे राष्ट्रीय सेमिनार होते.तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडियामध्ये या नियमांचा सखोल अभ्यास करणारे ते एकमेव आंतरराष्ट्रीय पंच आहेत.

या सेमिनारमध्ये नवीन नियम, स्पर्धा संचालन, स्कोअरिंग सिस्टीम, शारीरिक पात्रता चाचणी तसेच लेखी परीक्षा घेण्यात आली. उत्तर प्रदेश तायक्कांदो असोसिएशनचे महासचिव राजकुमार यांनी सांगितले की, आंतरराष्ट्रीय पंच सुभाष पाटील यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पंच म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. त्यांनी विविध देशांमध्ये जाऊन तायक्कांदो विषयक सेमिनार घेतले असून ते प्रथम श्रेणीचे आंतरराष्ट्रीय पंच आहेत. राजकुमार पुढे म्हणाले की, तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडियामध्ये सुभाष पाटील अतिशय प्रभावीपणे कार्य करत आहेत. स्वतः सातत्याने उपस्थित राहून ते भारतीय खेळाडू व पंचांना नवीन नियमांची माहिती देतात, ज्याचा देशातील तायक्कांदो खेळाडूंना चांगलाच फायदा होणार आहे.

## महामार्गाच्या ठेकेदाराने गटाराचे काम तातडीने करावे - दुकान व्यवसायिकांची मागणी

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१७, पाटण (सातारा) :** कराड-चिपळूण राष्ट्रीय महामार्गाचे काम अंतिम टप्प्यात आले असून पाटण शहरातील रस्त्याचा निपटारा जवळपास झाला आहे. मात्र, रस्त्याच्या दुतर्फा गटारांचे काम रखडल्याने नागरिकांच्या अडचणीत वाढ झाली आहे. ते तातडीने करावे दुकान व्यवसायिकांची मागणी होत आहे. रस्त्याची उंची अचानक वाढल्याने लगतची दुकाने, गाळे व घरे अक्षरशः दिसेनाशी झाली आहेत. अनेकांचे तळमजले मुजल्याचे रूप आले आहे. नशिब बलवत्तर म्हणून पाऊस लांबला, अन्यथा पाणी रस्त्यावरून थेट घरात-दुकानात शिरले असते. रस्त्याच्या दोन्ही बाजूला अद्याप गटारे झालेली नाहीत. अचानक पाऊस आला तर पाण्याचा निचरा होणार नाही. संपूर्ण पाणी रस्त्यावरून वाहून दुकाने व घरांमध्ये शिरेल. त्यामुळे होता होईल तेवढी गटारे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करणे गरजेचे आहे, अशी मागणी स्थानिक व्यापारी व नागरिक करत आहेत.



सध्या रस्ता थोडाफार वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. एका बाजूला पोती अंथरून पाणी मारले जात असताना दुसऱ्या बाजूने लहान वाहनांना मुभा दिली आहे. मात्र, नियम धाब्यावर बसवून अवजड वाहने ही याच मार्गावरून ये-जा करत आहेत. रस्त्याचे काम पूर्ण होण्यापूर्वीच अवजड वाहनांमुळे काँक्रीटीकरणाचे तडे जाण्याची व रस्त्याचे आयुष्य घटण्याची भीती व्यक्त होत आहे. यंदा कदाचित काही दुर्घटना घडली तर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पोलीस की अन्य कोणता विभाग जबाबदारी घेणार, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. एकीकडे काम सुरू असताना दुसरीकडे नवीन रस्त्यावर वाहने लावून फिरणाऱ्यांची संख्या कमी नाही. एक बाजू सुरू होताच वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. अनेक ठिकाणी रस्ता जोडण्यासाठी दगड-मुरूम टाकून पर्यायी मार्ग केले आहेत. रस्ता बनत असताना त्याची काळजी घेणे आपले कर्तव्य आहे, या भावनेला केराची टोपली दाखवून लोक बिनधास्त ये-जा करत आहेत. मुळात या सर्व गोष्टींकडे राष्ट्रीय महामार्ग विभागाने लक्ष घालणे अपेक्षित असताना संबंधित विभाग मात्र नेहमीच गाफील राहिल्याचे दिसून येते. याउलट रस्ता बंद असल्याचे सांगणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच काही नागरिक शिवीगाळ करत असल्याच्या घटना समोर आल्या आहेत. रस्ता भक्कम व मजबूत झाला तर सर्वांनाच प्रवास सुखकर होईल, याची नोंद नागरिकांनी घेणे गरजेचे आहे. राहिला प्रश्न उर्वरित कामाचा, तर ठेकेदाराने गटारे व जोडरस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**पावसापर्यंत होतील तेवढी गटारे पूर्ण करू - मणेर**

याबाबत राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी मणेर यांच्याशी संपर्क साधला असता, पाटण शहरातील रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. पाऊस सुरू होईपर्यंत होतील तितकी गटारांची कामे पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. नागरिकांनी सहकार्य करावे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

## केव्हीकेमधील कृषी निविष्ठा परवानाधारक विक्रेता प्रशिक्षणास उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१७, दहीगाव (अहिल्यानगर) :** श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था संचलित कृषि विज्ञान केंद्र, दहीगाव आणि कॉमन सर्व्हिस सेंटर, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या सचिवांसाठी आयोजित करण्यात आलेला खते, बियाणे, कीटकनाशके व कृषी निविष्ठा परवानाधारक विक्रेता प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. दि.०१ ते १५ जून २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षणात अकोले, कोपरगाव, नेवासा, पाथर्डी, राहुरी, संगमनेर, शेवगाव, श्रीगोंदा आणि राहाता तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे सचिव व प्रतिनिधी अशा सुमारे ३० जणांनी सहभाग नोंदविला. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी कॉमन सर्व्हिस सेंटर, महाराष्ट्रचे असिफ पठाण व राहुल काळे उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी कॉमन सर्व्हिस सेंटरचे उपाध्यक्ष देवेंद्र रस्तोगी यांचे मोलाचे योगदान लाभले. प्रशिक्षणामध्ये मृदाशास्त्र, खतटंचाईच्या पार्श्वभूमीवर युरिया व डीएपीला पर्याय म्हणून मिश्र व संयुक्त खतांचा वापर, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, नैसर्गिक शेती, बियाणे तंत्रज्ञान, पीक उत्पादन तंत्रज्ञान, कीड व रोग ओळख, तण व्यवस्थापन, एकात्मिक कीड व्यवस्थापन, सुरक्षित कीटकनाशक वापर, कृषी निविष्ठा विक्रीसंबंधी कायदे व नियम, कृषी व्यवसाय व्यवस्थापन आणि ग्राहक सेवा कौशल्ये यांसह विविध विषयांवर तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले. याशिवाय एल निनोच्या प्रभावाबाबत मार्गदर्शन, प्रात्यक्षिके, गटचर्चा, नैसर्गिक शेतीची प्रात्यक्षिके, क्षेत्रभेटी आणि अध्ययन सहलींच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला. कृषी सेवा केंद्रांचे प्रभावी व्यवस्थापन, साठा नियंत्रण, संगणकीय नोंदी ठेवणे आणि सुरक्षितता उपाययोजनांबाबतही शास्त्रज्ञांनी मार्गदर्शन केले. समारोपप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे संचालक काकासाहेब शिंदे यांनी कृषी निविष्ठा विक्रेत्यांची भूमिका केवळ विक्रीपुरती मर्यादित नसून शेतकऱ्यांना शास्त्रशुद्ध मार्गदर्शन करणारे सक्षम सल्लागार म्हणून त्यांनी कार्य करणे आवश्यक असल्याचे सांगितले. कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ.श्यामसुंदर कौशिक यांनी प्रशिक्षणातून प्राप्त झालेले ज्ञान शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी उपयोगात आणण्याचे आवाहन केले. नवी दिल्ली येथून कॉमन सर्व्हिस सेंटरचे व्यवस्थापक मिथिलेश सिंग हे ऑनलाइन पद्धतीने सहभागी झाले होते. रासायनिक खतांच्या टंचाईच्या काळात शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी सहकार क्षेत्रातील प्रशिक्षित मनुष्यबळाची महत्त्वपूर्ण भूमिका राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच प्रशिक्षणाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल त्यांनी कृषि विज्ञान केंद्राचे विशेष आभार मानले. यावेळी सहाय्यक निबंधक अमोल माने, दहीगावचे उपसरपंच सूर्यकांत पाऊलबुद्धे, सुलतानपूरचे सरपंच बाळासाहेब धोंडे तसेच प्रगतिशील शेतकरी राजेश कडू पाटील उपस्थित होते. प्रशिक्षणार्थींनी या प्रशिक्षणाबाबत समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी अतिरिक्त बसफेऱ्या सुरू करा

## राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाचे लासलगाव आगार व्यवस्थापकांना निवेदन

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१७, विंचूर (नाशिक) :** नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाल्याने शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची वर्दळ वाढली आहे. विद्यार्थ्यांची ही वाढती गर्दी आणि सध्याचा पावसाळा-उन्हाळा लक्षात घेता, त्यांच्या सुरक्षित व सोयीस्कर प्रवासासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणीराष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाच्यावतीने लासलगाव आगार व्यवस्थापकांकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

**शाळा-महाविद्यालयांच्या वेळेनुसार बसफेऱ्यांचे नियोजन करा**

निवेदनात नमूद केल्यानुसार, लासलगाव हे परिसरातील मोठे शैक्षणिक केंद्र आहे. त्यामुळे दररोज ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थी व विद्यार्थिनी शिक्षणासाठी येथे येत असतात. सध्याच्या परिस्थितीत, विशेषतः विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. ही बाब लक्षात घेऊन शाळा व महाविद्यालये सुटण्याच्या वेळेनंतरकिमान अर्ध्या तासानेअतिरिक्त बसफेऱ्या सोडण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील मार्गांवर लक्ष केंद्रित करण्याची विनंती करण्यात आली आहे : -

- लासलगाव ते चांदवड
- लासलगाव ते मनमाड
- लासलगाव ते पिंपळगाव - कोटमगाव - खांडगाव

**बसस्थानकावर शेड आणि निवाऱ्याची गरज**

विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसोबतच बसस्थानक परिसरातील गैरसोयींकडेही निवेदनातून लक्ष वेधण्यात आले. सध्या बसस्थानक परिसरात विद्यार्थ्यांना उन्हापासून आणि पावसापासून संरक्षण मिळण्यासाठी पुरेशी सावली किंवा निवाऱ्याची व्यवस्था उपलब्ध नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना तासनतास उघड्यावर थांबावे लागते. प्रशासनाने यावर गांभीर्याने विचार करून विद्यार्थ्यांना थांबण्यासाठी तातडीने शेड व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे.



हे निवेदन देताना राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाचे महाराष्ट्र प्रदेश सचिवसोमनाथ मानकर, उत्तर महाराष्ट्र अध्यक्षराहुल वैराळ, निफाड तालुका अध्यक्षअनिल भावसारतसेच माहिती अधिकार संघाचे नाशिक जिल्हा संघटकदुशांत आहिरे आदी उपस्थित होते.

# ४ हजार रुपयांची लाच घेताना दुय्यम निबंधक व ऑपरेटर जाळ्यात

## चंद्रपुरात लाचलुचपत विभागाची मोठी कारवाई

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, चंद्रपूर :** भद्रावती तालुक्यातील मालमत्तेच्या दस्तऐवजांची रजिस्ट्री करुन देण्यासाठी प्रत्येक रजिस्ट्रीवर २ हजार रुपये याप्रमाणे एकूण ४ हजार कुपयांची लाच मागून ती ऑपरेटरमार्फत स्वीकारणाऱ्या दुय्यम निबंधकासह त्यांच्या ऑपरेटरला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले.मोहन चंद्रकांत शेटट्टीवार (दुय्यम निबंधक श्रेणी-१, चंद्रपूर) असे लाचखोर अधिकाऱ्याचे नाव आहे. ही धडक कारवाई दि.१६ जून २०२६ रोजी करण्यात आली.

तक्रारदाराने आपल्या पक्षकाराच्या दोन मालमत्तांच्या नोंदणीसाठी चंद्रकपूर येथील दुय्यम निबंधक कार्यालयात कागदपत्रे सादर केली होती. ही रजिस्ट्री करुन देण्याच्या मोबदल्यात दुय्यम निबंधक शेटट्टीवार यांनी ४ हजार रुपयांची लाच मागितली. तक्रारदाराची लाच देण्याची अजिबात इच्छा नसल्याने त्यांनी याप्रकरणी चंद्रपूर एसीबी कार्यालयात तक्रार नोंदविली. लाचलुचपत विभागाने काल केलेल्या पडताळणी दरम्यान, अधिकारी शेटट्टीवार यांनी लाचेची मागणी करुन ती रक्कम त्यांच्या डेटा ऑपरेटरमार्फत स्वीकारली. पैसे स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्यांना ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरु आहे.

ही यशस्वी कारवाई एसीबी नागपूरचे पोलीस अधिक्षक डॉ. दिगंबर प्रधान, अप्पर पोलीस अधीक्षक माधुरी बावीस्कर यांच्या मार्गदर्शनात, चंद्रपूरचे पोलीस उपअधीक्षक अनिल जिट्टावार, पोलीस निरीक्षक सचिन धर्मेजवार व त्यांच्या सापळा पथकाने केली.कोणत्याही शासकीय कामासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त लाचेची मागणी केल्यास नागरिकांनी तातडीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन एसीबी प्रशासनाने केले आहे.

# आ.विनोद निकोले यांच्या अध्यक्षतेखाली विकासकामांचा आढावा

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१७, तलासरी (पालघर) :** तलासरी पंचायत समिती सभागृहात बुधवारी आमदार विनोद निकोले यांच्या अध्यक्षतेखाली विविध शासकीय विभागांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. तालुक्यात सुरू असलेल्या विकासकामांची प्रगती, शासकीय योजनांची अंमलबजावणी तसेच नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सुविधांबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत शिक्षण विभाग, प्रधानमंत्री आवास (घरकुल) योजना, कातकरी वस्ती विकास योजना, पशुसंवर्धन विभाग, कृषी विभाग, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा), ग्रामपंचायत विभाग, आरोग्य विभाग, एकात्मिक बालविकास सेवा योजना तसेच



## योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या सूचना

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. आमदार निकोले यांनी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांकडून सुरू असलेल्या कामांची माहिती घेतली. शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने पोहोचावा, प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत तसेच नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवाव्यात, अशा सूचना त्यांनी संबंधित विभागांना दिल्या.

घरकुल योजना, कातकरी समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा, शिक्षणाचा दर्जा, मनरेगा अंतर्गत सुरू असलेल्या कामांची प्रगती आणि ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात येणाऱ्या विकासकामांबाबत यावेळी सखोल चर्चा करण्यात आली.

या बैठकीस गटविकास अधिकारी वैभव साबळे, सहाय्यक गटविकास अधिकारी प्रदीप शेलार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तालुक्यातील विकासकामांना गती देण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

जनहिताच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत त्यांचा लाभ पोहोचविण्यासाठी प्रशासनाने अधिक तत्परतेने कार्य करावे, असे आवाहन आमदार निकोले यांनी बैठकीत केले.

# गंगापूर तालुक्यात ‘नाम’ फाउंडेशनचा मोठा दिलासा!

## पेरणीपूर्वीच ३ गावांतील महिला शेतकऱ्यांना मोफत बियाणे वाटप

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, गंगापूर :** खरीप हंगामाच्या तोंडावर शेतीखर्च आणि कुटुंब कसा सांभाळायचा, या विवंचनेत असलेल्या गंगापूर तालुक्यातील शेतकरी कुटुंबांना आज खूप मोठा मायेचा आधार मिळाला आहे. ‘नाम फाउंडेशन’, ‘पर्याय संस्था’ (कळंब) आणि ‘श्री स्वामी विवेकानंद समाज सेवा मंडळ’ यांच्या संयुक्त विद्यमाने आज १५ जून २०२६ रोजी सिरेसायगाव येथे एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. या अंतर्गत परिसरातील तीन गावांतील गरीब, गरजू आणि अल्पभूधारक महिला शेतकऱ्यांना मका व कपाशीच्या बियाण्यांचे मोफत वाटप करण्यात आले. ऐन पेरणीच्या तोंडावर मिळालेल्या या मदतीमुळे शेकडो महिला शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हसू उमलले आहे.

**संकटाच्या काळात ‘नाम’ चा संवेदनशील पुढाकार**

दुष्काळ, नापिकी आणि शेतीचा वाढता खर्च यामुळे ग्रामीण भागातील महिला शेतकरी मोठ्या जिद्दीने आणि संघर्षाने शेती करत आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या संसाराला आणि शेतीला हातभार लागावा, या उदात्त भावनेतून हा बियाणे वाटप सोहळा पार पडला. नाम फाउंडेशनचे प्रकल्प समन्वयक विनायक शिनगे, डी. के., पर्याय संस्थेचे श्री. ऋषिकेश तोडकर, तसेच स्वामी विवेकानंद समाज सेवा मंडळाचे बाबासाहेब नेमाने व सुनील नेमाने यांच्या हस्ते या बियाण्यांचे वाटप करण्यात आले. महिलांचे शेतीतील योगदान अथांग आहे, त्यांना वेळेत मदत करणे हे आमचे कर्तव्य आहे, अशी भावना या वेळी मान्यवरांनी व्यक्त केली.

**परिसरातील मान्यवरांची मांदियाळी :** या मोठ्या कार्यक्रमाला सिरेसायगाव आणि परिसरातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती होती. यामध्ये शरद जगताप (उपसरपंच, सिरेसायगाव) गोरखनाथ पा. नेमाने (चेअरमन), पांडुरंग पाटील जगताप (अध्यक्ष, पोलीस पाटील संघटना), रुस्तुम पाटील नेमाने (अध्यक्ष, तंटा मुक्ती समिती), लक्ष्मणराव तांबे (माजी सरपंच व प्रगतशील




शेतकरी), अशोक जगताप (संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, लासूर स्टेशन), कडू पाटील जगताप, किशोर गरुड (सरपंच पुत्र), हरिदास नेमाने, अशोक घोलप, विजय जगताप, विलास नेमाने, अरुण गायकवाड, भगवान जगताप, आण्णासाहेब जगताप, आणि अन्वर शेख (संगणक चालक) यांच्यासह तिन्ही गावांतील शेकडो महिला व पुरुष शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन योगेश नेमाने यांनी केले.

**स्थानिक कार्यकर्त्यांचे परिश्रम आणि मोफत सेवा :**

हा भव्य कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनील नेमाने, अशोक गडकर, अमोल नेमाने, अक्षय वायकोस, किशोर वायकोस आणि शेखनाथ कोळेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. शिस्तबद्ध नियोजन आणि लाभार्थी महिलांची चोख व्यवस्था यांमुळे कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. विशेष म्हणजे, या सामाजिक कार्यात आपला खारीचा वाटा उचलत ’उज्ज्वला साउंड सर्व्हिस’चे मालक आप्पा जगताप यांनी मंडप आणि माईक डेकोरेशनची सेवा पूर्णपणे मोफत देऊन दातृत्वाचा नवा आदर्श घालून दिला.

हा कार्यक्रम केवळ बियाणे वाटपाचा नव्हता, तर तो ग्रामीण भागातील कष्टकरी महिलांच्या संघर्षाचा सन्मान होता. खरीप हंगामाच्या पूर्वसंध्येला सिरेसायगावच्या मातीत आज बियाण्यासोबतच विश्वास, आधार आणि माणुसकीचीही नवी पेरणी झाली आहे, अशा शब्दांत ग्रामस्थांनी ’नाम’ फाउंडेशन व सर्व सहयोगी संस्थांचे मनापासून आभार मानले.

# नवीन पनवेलमध्ये अनधिकृत टपऱ्या व चिकन दुकानांवर कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१७, पनवेल :** महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ‘ड’अंतर्गत नवीन पनवेल येथील गणेश मार्केट परिसरातील अनधिकृत टपरीधारकांवर तसेच सेक्टर ०३, नवीन पनवेल येथील अनधिकृत चिकन दुकानांवर आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार तोडक कारवाई करण्यात आली.

अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे आणि उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कारवाई सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रूपाली माने यांच्या उपस्थितीत करण्यात आली.




या कारवाईत प्रभाग अधीक्षक राजेश डोंगरे, खांदेश्वर पोलिस स्थानकाचे पोलीस पथक, अतिक्रमण पथक, प्रभाग कार्यालयातील कर्मचारी, रायगड सुरक्षा रक्षक तसेच एम.एस.एफ. सुरक्षा रक्षक यांनी सहभाग घेतला.

सार्वजनिक ठिकाणी अनधिकृतरित्या उभारण्यात आलेल्या टपऱ्या व दुकाने यामुळे नागरिकांच्या वाहतुकीस तसेच परिसराच्या स्वच्छतेस अडथळा निर्माण होत असल्याने ही कारवाई करण्यात आली. अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात महानगर पालिकेची कारवाई पुढेही नियमितपणे सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# नगरसेविका वेदिका पाटील यांच्या मागणीला यश : नवीन जलवाहिनीच्या कामाला सुरुवात

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१७, दिवा (ठाणे) :** ठाणे महापालिकेच्या प्रभाग क्र. २९ मधील भोलेनाथ नगर येथील नागरिकांच्या पाणी टंचाईच्या समस्येवर अखेर तोडगा निघाला आहे. स्थानिक नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांनी केलेल्या मागणीला यश आले असून, आज नवीन जलवाहिनी टाकण्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे.

**काय होती मागणी? :** भोलेनाथ नगर हा डोंगराळ भाग असल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईला सामोरे जावे लागत होते. अनेक ठिकाणी जलवाहिनी दूर असून सध्याच्या उपजलवाहिन्या गटारातून गेल्याने त्या नादुरुस्त झाल्या होत्या. त्यामुळे नागरिकांना दूषित व कमी दाबाने पाणी मिळत होते. तसेच नुकत्याच झालेल्या नालेसफाई दरम्यान काही जलवाहिन्या फुटल्याने पाणीपुरवठा पूर्णपणे खंडित होण्याची भीती होती.

या गंभीर समस्येची दखल घेत नगरसेविका वेदिका पाटील यांनी दि. १२/०५/२०२६ रोजी उपनगर अभियंता, पाणीपुरवठा विभाग, विनोद पवार यांना पत्र लिहून भोलेनाथ




नगरमध्ये १०० मि.मी. आणि ८० मि.मी. व्यासाची नवीन उपजलवाहिनी तातडीने टाकण्याची मागणी केली होती.

**मागणीला यश, आज कामाला सुरुवात :** नगरसेविका वेदिका पाटील यांच्या पाठपुराव्याला यश आले असून, आज नागरिकांना दिलेले वचन पूर्ण करत नवीन जलवाहिनी टाकण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

या शुभ प्रसंगी नगरसेविका वेदिका पाटील, नगरसेवक बाबाजी पाटील व नगरसेविका अर्चना पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीफळ फोडून कामाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी साहिल पाटील, बाळाराम पाटील, कृष्णा मडीवाल व भाजप पदाधिकारी सतीश मिश्रा, नागेश मडीवाल, राहुल, जय पाटील, यश पाटील, सलीम सय्यद, राजकुमार गुप्ता यांच्यासह भोलेनाथ नगरचे ग्रामस्थ सुद्धा मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**नागरिकांकडून आभार :** पाणी हा मूलभूत प्रश्न होता. वेदिका ताईंनी मागणी केली आणि लगेच कामही सुरू केले. दिलेला शब्द पाळल्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार, अशा भावना नागरिकांनी व्यक्त केल्या.

# थोडक्यात

## नवागतांचे स्वागत ही भारतीय संस्कृती - राजेंद्र ठुबे

### टाकळी ढोकेश्वर शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात



**अक्षराज : वसंत रांधवन**

**दि.१७, टाकळी ढोकेश्वर (अहिल्यानगर) :** भारतीय संस्कृतीत नवागतांच्या स्वागताला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. नवागत आपल्या सोबत अनेक गुण, कौशल्ये व ज्ञान घेऊन येतात. त्यांच्या बौद्धिक विकासाला वाव देण्याचे कार्य नवीन ठिकाणी केले जाते, म्हणून नवागतांचे स्वागत ही भारतीय संस्कृती आहे. असे प्रतिपादन टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र ठुबे यांनी केले. शाळेत नव्या शैक्षणिक वर्षाच्या स्वगत कार्यक्रमात ते बोलत होते. प्रवेशत्सवानिमित्त आकर्षक सजावट करून नवागतांचे आनंददायी सुरुवात करत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टाकळी ढोकेश्वर येथे शाळा प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. इयत्ता पहिलीत दाखल झालेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांच्या गजरात, गुलाबपुष्प, फुगे आणि आकर्षक भेटवस्तू देऊन जल्लोषात स्वागत करण्यात आले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. नवागत विद्यार्थ्यांच्या पालकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश झावरे, उपाध्यक्ष योगीराज झावरे, उपाध्यक्षा शितल रांधवान,वृषाली मंचरे,नितीन धुमाळ,प्रियंका पवार, पत्रकार तथा समिती सदस्य विनोद गायकवाड, मुख्याध्यापक राजेंद्र ठुबे, शिक्षक बाबाजी नवले, जयश्री गाडेकर, अलका भानगडे, लतीभाभी तांबोळी,सुचेता खिलारी आणि संध्या घोलप यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रविण झावरे यांनी केले.

## पत्रकार राजकुमार इकडे यांना महाराष्ट्र गुण गौरव पुरस्कार जाहीर



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, पारनेर (अहिल्यानगर) :** सामाजिक, पत्रकारीता व जनजागृती क्षेत्रातील गेली १५ वर्षाच्या कालखंडात उल्लेखनिय योगदानाबद्दल पत्रकार राजकुमार इकडे रा.राजणगाव रोड, ता.पारनेर, जि.अहिल्यानगर यांची बी.द चेंज फाउंडेशन तर्फे दिल्या जाणार्या महाराष्ट्र गुण गौरव पुरस्कार २०२६ साठी निवड करण्यात आली. पत्रकारीतेच्या माध्यमातुन समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडणे, जनहिताच्या विषयावर सातत्याने लेखन करणे तसेच समाजीक बांधिलकी जपत केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक परिवर्तनासाठी प्रेरणा निर्माण होत आसल्याची भावना संस्थेने व्यक्त केली आहे. रविवार, दि.०६ सप्टेबर २०२६ रोजी शिर्डी येथे होणार्या भव्य पुरस्कार सोहळ्यात त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. बी.द.चेंज फाउडेशन चे अध्यक्ष अभिषेक तुपे यांनी राजकुमार इकडे यांना पुरस्कारासाठी निवड झाल्याची माहीती दिली आहे. त्यांच्या निवडी बद्दल पत्रकार, सामाजिक, राजकिय व विविध क्षेत्रातील मान्यवरांकडुन त्यांचे अभिंनदन करण्यात येत आहे.

## अशोक कावरे यांची पारनेर तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील हिवरे कोरडा गावचे मूळ रहिवासी व सध्या पुणे येथे व्यवसायानिमित्त स्थायिक असलेले अशोक सोनबा कावरे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पारनेर तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पारनेर तालुकाध्यक्ष विक्रमसिंह बबनराव कळमकर यांच्या स्वाक्षरीचे नियुक्तीपत्र आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते अशोक कावरे यांना प्रदान करण्यात आले.

नियुक्तीपत्रात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते दिवंगत उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या विचारांचा वारसा तसेच पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा व उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या पुरोगामी विचारांचा प्रचार-प्रसार करून पक्षाची ध्येयधोरणे समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी कार्य करावे व सर्वसामान्य जनतेच्या विकासाशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहावे, असेही नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे.

अशोक कावरे हे सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या नियुक्तीमुळे पारनेर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळ मिळणार असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. त्यांच्या निवडीबद्दल हिवरे कोरडा, पारनेर तालुका तसेच पुणे येथील मित्रपरिवार आणि कार्यकर्त्यांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## २० जून रोजी देशभरात साजरा होणार पीएम किसान उत्सव दिवस

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१७, ठाणे :** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा माहे एप्रिल २०२६ ते जुलै २०२६ कालावधीतील २३ वा हप्ता पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या शुभहस्ते दि.२० जून, २०२६ रोजी पश्चिम बंगालमधील हुगळी जिल्ह्यातील तारकेश्वर येथून वितरित होणार आहे. या प्रसंगाचे औचित्य साधून केंद्र शासनाने दि.२० जून २०२६ हा दिवस संपूर्ण देशभर पी.एम.किसान उत्सव दिवस म्हणून साजरा करण्याचे करण्याचे ठरविले आहे. केंद्र शासनाने शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न देण्याकरीता प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजना माहे फेब्रुवारी, २०१९ पासून सुरु केली आहे. या योजनेच्या निकषांनुसार सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) रु.२०००/- प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी रू.६०००/- त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात लाभ जमा करण्यात येत आहे. पीएम किसान योजने अंतर्गत राज्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना यापूर्वी एकूण २२ हप्त्यांमध्ये सुमारे रू.४१०८३.०० कोटीचा लाभ जमा झालेला आहे.